**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. १६/२०१६-१७/१४०    दिनांक: २७-०९-२०१६

**आदेश**

**आदेश केस क्र. १६/२०१६-२०१७**

१) डॉ.सौ. ज्योती सारंग खापरे :
मु. पो. डफळापूर
ता. जत, जिल्हा. सांगली
— **तक्रार अर्जदार (ग्राहक)**

**विरुध्द**

१) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
मंडल कार्यालय, सांगली.

२) कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, कवठेमहांकाळ

३) उपकार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
उपविभाग जत
— **विरुध्द पक्षकार**

**कोरमः-** १.श्री वि.श. गुळवणी, अध्यक्ष
२.श्री. प्र.वि. खपली, सदस्य सचिव,
२. श्री. पी. एस. बुरांडे, ग्राहक सदस्य,

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**न्याय निर्णय**

मी वि.श. गुळवणी अध्यक्ष, ग्राहक तक्रार निवारण मंच कोल्हापूर, खालीलप्रमाणे न्याय निर्णय देत आहे.

१) तक्रारदार डॉ. सौ. ज्योती सारंग खापरे, रा. डफळापूर ता. जत. जि. सांगली यांनी नवीन बांधकामासाठी वीज जोडणी घेतली होती. बांधकाम पूर्ण झालेनंतर त्यांनी त्या जागेत वैद्यकिय व्यवसाय चालू केला. मा. विद्युत नियामक आयोगाने दि. २६-०६-२०१५ रोजी L.T. I (B) : L.T. Residential असे नवीन टेरिफ मंजूर केल्यानंतर दिनांक २९-०६-२०१५ रोजी तक्रारदार यांनी वाणिज्य ऐवजी /घरगुती असे टेरिफ बदलून मिळणेबद्दल वि.प. यांच्या संबंधित कार्यालयाकडे अर्ज सादर केला. त्या अर्जाचा विचार न केल्यामुळे अखेर तक्रारदार यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे दि. २५-०४-२०१६ रोजी गा-हाणे दाखल केले. त्यानंतर मात्र वि.प. यांचे संबंधित अधिकारी यांनी लगेच जागेची पाहणी करुन तक्रारदार यांची मागणी योग्य असल्याचे दि. २५-०५-२०१६ च्या पत्राने मान्य केले. परंतु नवीन दरसंकेत तक्रारदार यांच्या अर्जाच्या दिनांकापासून लागू न करता दि. २५-०५-२०१६ पासून लागू केला. तक्रारदार यांच्या कथनानुसार वि.प. यांनी वर्गवारी देण्यात ४५ आठवडे विलंब केला. त्यामुळे तक्रारदार यांनी प्रस्तुत गा-हाणे दि. २७-०७-२०१६ रोजी दर आठवडयास शंभर रुपये प्रमाणे विलंबाची भरपाई मिळणेसाठी आणि कृति मानकांचे योग्य पालन करणेची सुचना वितरण कंपनीस देणत यावी. यासाठी मंचासमोर दाखल केले आहे.

२) वि.प. यांचेतर्फे लेखी निवेदन दि. १८-०८-२०१६ नमूद असलेले दि. २०-०९-२०१६ रोजी मंचासमोर दाखल केले आहे. त्यामध्ये असे कथन केले आहे की, तक्रारदार यांचा (वरीलप्रमाणे) वर्गवारी बदलून मिळणेचा अर्ज दि. २९-०६-२०१५ रोजी प्राप्त झाल्यानंतर तो दिनांक १४-०७-२०१५ रोजी शाखा कार्यालय, डफळापूर यांचेकडे पाठवणेत आला. दि. २५-०५-२०१६ चा स्थळ तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर असे निदर्शनास आले की, तक्रारदार यांचे बांधकाम पूर्ण झाले असून त्या ठिकाणी दवाखान्यासाठी वीजवापर चालू आहे. त्यापूर्वी तक्रारदार यांनी बांधकाम पूर्ण झालेबद्दल लेखी कळविले नव्हते. मे-२०१६ पासून तक्रारदार यांना घरगुती दराने बिले पाठवणेत येत आहेत.

३) सदर प्रकरणाची अंतिम सुनावणी या मंचासमोर दि. २२-०९-२०१६ रोजी नेमणेत आली. त्यावेळी तक्रारदारतर्फे श्री हरिभाऊ खापरे हे प्रतिनिधी हजर होते. वि.प. तर्फे कार्यकारी अभियंता श्री दराडे व श्री मैलापूरे हजर होते. सर्व उपलब्ध कागदपत्रांचे बारकाईने अवलोकन करुन उभय पक्षांचा तोंडी युक्तिवाद ऐकणेत आला. त्यावेळी श्री खापरे यांनी प्रति आठवडा शंभर रुपये भरपाईची मागणी स्वत:हून मोकळेपणाने सोडून दिली आणि त्याऐवजी ऑगस्ट-२०१५ पासून जादा वसूल केलेली देयकांची रक्कम अदा करणेबद्दल अगर समायोजित करणेबद्दल तोंडी विनंती केली.

४) या मंचाचे निर्णयासाठी खालील मुद्दे उपस्थित होत आहेत.

(१) तक्रारदार तर्फे करणेत आलेली वर कलम ३ मध्ये नमूद केलेली मागणी मान्य करता येण्यासारखी आहे काय?

उत्तरः- होय.

(२) कोणता अंतिम आदेश?

उत्तर :- शेवटी नमूद केल्याप्रमाणे.

## **कारणमिमांसा**

५) तक्रारदार यांचे गा-हाणे व वि.प. यांचे लेखी निवेदन या दोहोंचा विचार करता काही गोष्टी स्पष्ट होतात. तक्रारदार डॉ. सौ. ज्योती खापरे यांनी बांधकामासाठी वीज ग्राहक क्र. २७१०००१०५०४३ नुसार वीज जोडणी व्यापारी दर संकेताने डिसेंबर २०१३ मध्ये वि.प. कडून घेतली होती. त्या व्यापारी दर संकेताबद्दल त्यांची कोणतीही तक्रार नाही. मा. महाराष्ट्र विद्युत नियाम आयोगाने दि. २६-०६-२०१५ रोजी नवीन वीजदर जाहिर/मंजूर करुन LT I (B) -Residential अशी नवीन वर्गवारी तयार करुन जे डॉक्टर, वकील वगैरे लोक स्वतःचे निवासस्थानात व्यवसाय करतात त्यांना काही विशिष्ट परिस्थितीत घरगुती दराने वीज पुरवठा करावा असे निर्देश दिले याबाबत वाद नाही. त्यानंतर त्वरीत, तक्रारदार यांनी दिनांक २९-०६-२०१५ रोजी वितरण कंपनीकडे अर्ज देऊन त्यांच्या सदर दवाखान्यातील वीज वापराची देयके घरगुती दराने आकारावीत अशी व्यापारी ऐवजी घरगुती वर्गवारी करुन मिळणेची विनंती केली. सदरच्या अर्जामध्ये बांधकाम पूर्ण झाल्याचे स्पष्ट शब्दात लिहिले नव्हते हे खरे आहे. सदरचा अर्ज जा.क्र. २१०८ दि. १४-०७-२०१५ चे पत्रानुसार पुढील कार्यवाहीसाठी शाखा कार्यालय, डफळापूर यांचेकडे पाठवणेत आला होता. त्यानंतर मात्र बराच काळ कोणतीही कार्यवाही दिनांक २४-०५-२०१६ पर्यन्त झाली नाही.

६) दिनांक २५-०५-२०१६ चा स्थळ तपासणी अहवाल दर्शवितो की, तक्रारदारांचे निवासस्थान व दवाखाना एकाच इमारतीत आहे. दि. २९-०६-२०१५ रोजी तक्रारदार यांनी उपरोक्त अर्ज दाखल केल्यानंतर जवळजवळ ११ महिने काहीही कार्यवाही वि.प. तर्फे करणेत आली नव्हती. तशी न करण्याची कारणेही स्पष्ट होत नाहीत. तक्रारदार यांनी बांधकाम पूर्ण झालेचे लेखी कळवले नव्हते हे कारण स्विकारार्ह नाही. दिनाक २९-०६-२०१५ नंतर केव्हाही बांधकाम पूर्ण झाले किंवा नाही अशी विचारण करणारी नोटीस तक्रारदार यांना पाठवणेत आली नाही. किंवा लौकरात लौकर स्थळ निरीक्षणही करण्यात आले नाही.

७) अंतर्गत तक्रार निवारण कक्षाने वरील बाबीचा विचार न करता दि. २८-०६-२०१६ चा आदेश जारी केला.

८) कृति मानके विनियम नुसार वि.प. यांनी टेरिफ वर्गवारी बदलणेची कार्यवाही दुस-या देयक चक्रापर्यन्त करणे आवश्यक होते. परंतु दि. २४-०५-२०१६ पर्यन्त कोणतीही हालचाल करणेत आली नाही. दिनाक २५-०५-२०१६ रोजी प्रथमच स्थळ निरीक्षण करण्यात आले.

९) वरील परिस्थितीत, तक्रारतर्फे प्रतिनिधी यांनी प्रति आठवडा शंभर रुपये भरपाईची मागणीमंचासमोर तोंडी कथन करुन सोडून दिली असली तरी फरकाची (देयकाची) रक्कम समायोजित करणेबाबतची त्यांची विनंती अमान्य करता येणेसारखी परिस्थिती नाही. सबब खालील प्रमाणे अंतिम आदेश निर्गमित करणेत येतो.

**आदेश**

१) दि. २९-०६-२०१५ नंतर दुस-या देयक चक्राचे कालावधी पासून एप्रिल २०१६ पर्यन्त तक्रारदार यांचेकडून वीज देयकाची वसूली घरगुती दराने (टेरिफ वर्गवारी LTI (B) LT Residential प्रमाणे) करणेत येऊन त्या कालावधीत यापूर्वी जादा दराने केलेली वीज देयकाची वसूली या पुढील वीज देयकांमधून समान हप्त्याने समायोजित करणेत यावी असा वि.प. याना आदेश देणेत येत आहे.

२) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

३) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| सही/- | सही/- | सही/- |
| (वि. श. गुळवणी) | (प्र.वि. खपली) | (श्री प्र एस. बुरांडे) |
| अध्यक्ष | सदस्य सचिव | ग्राहक सदस्य |